# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.१०/०८/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा

## गैरकायदयाची मंडळी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो.स्टे. राजापेठ अप.क्र. ७२९/२०२३ कलम १४३,१४७,१४८,१४९,५०४, ५०६ भा.द.वि. | फिर्यादीचे राहते घरासमोर सुशील नगर झोपडपट्टी अमरावती | घ.ता.वेळ - दि. 09/08/2023 चे 20-30 वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. 10/08/2023 चे 00-43 वा. | भुषण रमेशराव वाटकर वय 23 वर्ष रा. सुशील नगर झोपडपट्टी अमरावती | 1)गंगु उर्फ आकाश मोरे वय अं.24 वर्ष रा. केडीया नगर अमरावती 2)टकलु उर्फ हरिश बिवाड रा. बेलपुरा अमरावती + 3 चे 4 आरोपी इसम | हकीकत अशाप्रकारे आहे की, फिर्यादी व त्यांचे मित्र फिर्यादीचे घरासमोर उभे असतांना नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीतांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादी व त्यांचे मित्रांना मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे घरासमोर टुव्हिलर गाडीवर येवुन गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीला व त्याचे मित्रांना शिवीगाळ करून त्याचे मागे चाकु घेवुन आले. तेव्हा फिर्यादी व त्याचे मित्र तेथुन पळाले असता त्यांना मारण्याची धमकी देवुन टुव्हिलर गाडीवर निघुन गेले. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप क्र, ६२०/२०२३ कलम ३५४(ड) भादवी | भिमज्योत मंडळ गल्ली नं.२ फ्रेजरपुरा ते कुंभारवाडा अमरावती | दि.०८/०८/२०२३ चे १०.३० वा दरम्यान दाखल ता. वेळ १०/०८/२३ चे१४.०३ वा | एक महीला | विनोद घोडेस्वार रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही कामावर जात असतांना आरोपी हा नेहमी फिर्यादीच्या पाठीमागे येवुन वारंवार पाठलाग करतो . फिर्यादी हीने आरोपी यास विचारण्याचा प्रयत्न केला असता आरोपी हा तेथुन निघुन जातो. फिर्यादी बद्दल आरोपी याने कामावरील महीला यांना सुध्दा विचारपुस करत होता. दि.०८/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा दरम्यान फिर्यादी ही तिच्या घरून एक महीला यांच्या कामावर जात असतांना यातील आरोपी हा पाठलाग करीता फिरक्यादी हिचा विनयभंग केला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गन्हा दाखल |

## वाहनचोरी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अप क्र ३८४/२३ कलम ३७९ भादवी | अलीम नगर अमरावती | दि. ०८/०८/२०२३ चे २३/०० वा ते दि . ०९/०८/२०२३ चे २२/०० वा दरम्याण दखल दि. १०/०८/२०२३ चे ००/५३ वा | नाजीम खान नजर खान वय ३२ रा अलीम नगर अमरावती | अज्ञात | हकीकत आशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हा आठवड्यातुन ६ दिवस अँटो चालवुन १ दिवस बुधवार ह्या दिवशी पप्पु भाई चिवडा वाले याचे कडे मजुरीचे कामाकरिता जातो यातील फिर्यादीने त्याचे मालकीचा पँसेजर अँटो क्र Mh २७-BW२४१२ हा दि ०८/०८/२०२३ रोजी रात्री २३/०० वा घरासमोर उभा करुन दि. ०९/०८/२०२३ रोजी बुधवार ला पप्पु ला चिवड्यावाले यांचे कडे कामाला जावुन रात्री २२/०० वा घरी परत आला असता त्याचे घरासमोर उभा केलेल्या अँटोची पाहणी केली असता अँटोची फोर्स कंपनीची बँटरी कि ३००० रु कोणीतरी अज्ञात चोराने वायर कढुन चोरुन नेली अशा फि.चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप क्र, ६१८/२०२३ कलम ३७८ भादवी | ,परीहारपुरा वडाळी अमरावती | दि. ०७/०८/२०२३ चे १३.०० वा ते १६.०० वा दरम्यान दाखलता. वेळ दि. १०/०८/२०२३ चे ००.२९ | एक महीला | १गोपाल शंकर सावरकर ,२)भगवानदास्ा भिकुसिंग गाडकवाड ३) मनोज भैय्यालालल यादव सर्व रा. परीहारपुरा वडाळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे की, मी समक्ष पोलीस स्टेशन ला येवुन जबानी रिपोर्ट देते की, वर नमुद घटना ता. वेळी ठिकाणी यातील फिर्यादी ही कावड यात्रा मध्ये सहभाग घेम्याकरीता गेली असता फिर्यादीच्या दोन बक-ाय लाल रंगाच्या मानेवर पायावर पांढरे पट्टे असलेली वय ८ वर्ष कि. अंदाजे १६,००० /- रू ०४.०० वा दरम्यान घरी परत आल्यावर दिसुन आल्या नाही मोहल्यात व २ स्त्रीया यांची सुंध्दा दोन बकरी वर्णन पाढ-या रंगाची व दुसरी लाल भुरकट रंगाची वय अंदाजे २ वर्ष कि.अंदाजे १००००/- ची दिसुन आली नाही तसेच शेजारी राहणारी ३ महीला यांचे सुध्दा चार बक-या चौकात सोडल्याअसता कावड यात्रेतुन घरी आल्ययावर दिसुन आल्य.ा नाही यातील नमुद आरोपीवर बक-ाय चोरीचा संशय असल्याने अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे ्सिटी कोतवीली अप.क्र. ३३९/२३ कलम ३७९ भादवी | हॉटेल रॅलीश रेसिडेनसी अमरावती | घ.ता. वेळ ०७/०८/२३ चे रात्री ११.०० वा ते दि. ०८/०८/२३ चे दुपारी ०४.०० वा चे दरम्यान दा.ता.वेळ दि.१०/८/२३ चे ००.२८ वा | राहुल शंशीकात पाटील वय ४० वर्ष रा सराफा बाजार अनिल अग्रवाल यांचे घरासमोर अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी दि,९/८/२०२३ राहुल शंशीकात पाटील वय ४० वर्ष रा सराफा बाजार अनिल अग्रवाल यांचे घरासमोर अमरावती हे समक्ष पो.स्टे ला येवुन जबानी रिपोट देतो की वर नमुद पत्यावर राहत असुन हॅाटेल रॅलीश रेसिडेनसी अमरावती या हॉटेल मध्ये १२ वर्षापासुन मॅनेजर चे काम करतो हॉटेलच्या टेरेसवग हॉटेलचे सामान ठेवत असतो दि.८/८/२३ रोजी दुपारी ०४.०० वा माझ्या हॉटेलचा एसी बंद पडल्यामुळे मी टेरेसवर कॉम्प्रेसर जवळ गेलो असता त्या ठिकाणी एस.सी.च्या कॉम्प्रेसरची ाी ८ ते १० फुट ताब्याची पाईप कापुन घेवुन गेल्याचे दिसले तसेच ६ ते ७ फुटाची अंदाजे वजन १५ किलो पितळची समई किमंत ७०००/- रु दिसली नाही कोणीतरी अज्ञात ईसमाने दि.७/८/२३ चे रात्री ११.०० ते दि. ८/८/२३ चे दुपारी ०४.०० वा चे दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने हॉटेलच्या खुल्या टेरीसवर चढुन एसी च्या कॉम्प्रेसरची ाी ८ ते १० फुट ताब्याची पाईप किंमत अंदाजे ३०००/ रु तसेच ६ ते ७ फुटाची अंदाजे वजन १५ किलो पितळची समई किमंत ७०००/- रु असा एकुण १०,०००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरुन नेला आजपोवेतो बाहेरगावी असल्याने रिपोट देण्याकरीता आज रोजी पो.स्टे ला आलो अशा फिच्या जबानी रिपोट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुण नेणे

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पो.स्टे. राजापेठ अप.क्र. ७३०/२०२३ कलम ३६३भा.द.वि ा. | अमरावती | घ.ता.वेळ - दि. 09/08/2023 चे 15-00 वा. ते 20-00 वा. दरम्यान<br><br>दा.ता.वेळ - दि. 10/08/2023 चे 03-04 वा. | मनोज भिमरावजी काळमेघ रा. अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, फिर्यादी हे नेहमीचे कामावर गेले असता त्यादरम्यान नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि. नातेवाईक बाहेरून घरी आली असता तिला आदित्य घरी दिसला नाही. तिने फिर्यादीचे नातेवाईकाला फोन करून माहिती दिली असता फिर्यादीचे नातेवाईकाने फिर्यादीला फोन करून सांगीतल्यावर फिर्यादीने घरी पोहचल्यावर मोहल्यात आजुबाजुला व नातेवाईकाकडे आणि मुलाच्या मित्राकडे विचारपुस करून शोध घेतला असता नातेवाईक मिळुन आला नाही. त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले आहे. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

# इतर

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप क्र, ६१९/२३ कलम ४,२५ आर्म अँक्ट अधिकलम्‍ा १३५ मपोका | वैभव फर्निचर दुकान मालकासमोर शाम नगर अमरावती | क्र,दि.१०/०८/२०२३ चे ०१.३० वा दरम्यान<br><br>दि. १०/०८/२०२३ चे ०५.२९ वा | सरतर्फे योगेश श्रीवास ब न १०१५ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | शुभम मनोज इंदुले वय १९ वर्ष रा. शाम नगर संजिवनी रूग्णालय जवळ अमरावती | क्र,हकीकत अशा प्रकारे आहे आम्ही पोहेका योगेश श्रीवास ब न १०१५ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर येथे तैनातीस असुन दि. ९/८/२०२३ रोजी २१.०० पासुन दि. १०८/२०२३ चे ०८.०० वा पावेतो डि बी पथक म्हणुन पोस्टे हद्दीत रात्र गस्त ड्युटीवर असतांना शाम नगर चौक अमरावती एक गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली की एक इसम वैभव फर्नीचर नावाचे दुकानासमोर शामनगर अमरावती येथे सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर आपले ताब्यात धारधार शस्त्र बाळगुन हजर आहे अशा माहीती वरून सदर आरोपी कडुन एक लोखंडी पात्याचा धारधार शस्त्र कोयता ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शुभम मनोज इंदुले वय १९ वर्ष रा. शाम नगर संजिवनी रूग्णालय अमरावती असे सांगितले अशा फिर्दीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ३८३/२३ कलम १४२ मपोका | गुलीस्ता नगर चौक परिसरात अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे २२/३५ वा दाखल दि. १०/०८/२०२३ चे ००/१४ वा | पोउपनि सुशील कोडापे पो.स्टे नागपुरी गेट अमरावती शहर | अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर अमरावती | हकीकत अशा प्रकरे आहे की, आम्ही पोउपनि सुशील कोडापे सोबत ASI ८०४,पोहेका १०२३,नापोका ४३७,पोका ६७७ असे पो.स्टे नागपुरीगेट अमरावती शहर दि. ०९/०८/२३ रोजी २२/०० वा स्वताचे वाहणाने पेट्रोलींग करित असतांना २२/३५ वा दरम्ययाण गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की, पो.स्टे नागपुरीगेट अमरावती शहरातुन तडीपार असलेला इसम अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर चौक परिसरात वावरत आहे तसेच स्थानिक लोकांचे मनात भिती निर्माण करित आहे अशा माहीती वरुन आम्ही स्टाफ व पंच खाजगी वाहणाने तेथे गेलो असता सदर तडीपार इसम हा जोरजोराने ओरडुन हातवारे करित असतांना दिसला त्यास आम्ही पंचा समक्ष खात्री करुन ताब्ययात घेतले व त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर अमरावती असे सांगितले सदर इसम हा तडीपार असल्याची खात्री झाल्याने सदर इसम *हा मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ -१ यांचे आदेश क्र पोउपआ/परि/तडीपार/३०७३/२०२२ दि. १०/१२/२०२२ अनव्ये* अमरावती शहर व ग्रामीण हद्दीमधुन २ वर्षाकरिता तडीपार असतांना त्यांनी कोणताही पुर्व सुचना न देता शहरा मध्ये प्रवेश करतांना मिळुन आला वरुन त्याला अमरावती जिलह्यात येणाचे कारण विचारले असता कोणतेही ठोस कारण न देता परवांगी नसल्याचे सांगितले नमुद आरोपी ने दि १२/०७/२०२३ रोजी सुद्धा अशाच प्रकारे नमुद आदोशाचे उल्लघन केलेले आहे सदर आरोपी हा कोणत्याही आदेशाला जुमानत नसुन परिसरात दहशत पसरवित आहे सदर आरोपीने *हा मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ -१ यांचे आदेश क्र पोउपआ/परि/तडीपार/३०७३/२०२२ दि. १०/१२/२०२२ अनव्ये* उल्घन केल्ययाने नमुद आरोपी विरुद्ध कलम १४२ मपोका प्रमाने गुन्हहा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो.स्टे नागपरीगेट अमरावती अप क्र ३८६/२३ कलम महाराष्ट प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ ५(अ),(१),(२),९ प्राण्याचा छळप्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११(घ),(ड),(च) | पठाण चौक अमरावी | दि.१०/०८/२३ चे ११/३० वा ते १२/०० वा<br><br>दि. १०/०८/२३ चे १४/३८ वा | सपोनि संदिप तोताराम हिवाळे पो.स्टे नागपुरी गेट अमरावती | १)अँटो चालक अब्दुल नदीम अब्दुल अजीम वय २८ वर्ष रा बिस्मील्लला नगर अमरावती मालवाहुक क् एम.एच. ४९ ए.आर ६६८१<br>२) गोवंश जनावरांचा मालक मुद्दशीर शफीक कुरेशी | हकीकत अशा प्रकारे े आहे े की, यातील फिर्यादी पो.स्टाफ पोहेका २७७,४६४,नापोका १३०१,१३०७, असे पो.स्टे हद्दीत पेट्रोलींग दरम्याण ११/०० वा गुप्त माहीती मिळाल्या वरुन नमुद घटना ता.वेळी यातील फिर्यादी व पोलीस स्टॉफ दोन पंचा समक्ष मिळालेल्या पठाण चौक येथे जावुन थांबलो असता मिळालेल्या माहीती प्रमाने एक मालवाहु ु अँटो क्र एम.एच. ४९ ए.आर ६६८१पठाण चौक कडे येत आहे े त्यास अडवुन त्यातील अँटो चालकास खाली उतरवुन त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव अब्दुल नदीम अब्दुल अजीम वय २८ वर्ष रा बिस्मील्लला नगर अमरावती असे सांगितले वरुन आम्ही पंचा समक्ष सदर अँटो मागील डाल्ययाची पाहणी के ेली असता सदर अँटोच्या मागील डाल्ययात गोवंश दिसुन आले सदर गोवंश जनावराचे पाय व मुडके े दोरीच्या साह्याने बांधुन त्यांना वाहणा मध्ये निर्दयतेने वागणुक देवुन त्ययची कत्तली करण्याच्या उद्देशाने एकावर एक वाहनात कोंबुन भरुन अवैद्यरित्या वाहतुक करुन आल्याने दोन पंचा समक्ष दिसले सदर जनावराची पाहणी के ेली असता एकुण ७ जानवरे किं . अं. ४१००० रु चे मिळुन आले तसेच सदर अँटो चालकास जनावराचे मालका बाबत विचारणा कोली असता सदर गोवंश जनावरांचा मालक मालक मुद्दशीर शफीक कुरेशी असे सांगितले जप्त करण्ययात आलेले गोवंश यांचे संरक्षण व संवर्धन करिता गोरंक्षण संस्था दस्तुर नगर अमरावती येथे दाखल करण्यात आले अशा प्रकारे े जप्त एकुण ७ गोवंश जनावरे किं . अं. ४१००० रु एक मालहवाहु ु तीन चाकी अँटो क्र एम.एच. ४९ ए.आर ६६८१ कि. अं. ८०००० रु ु असा एकुण १२१,००० रु चा माल जप्त केला व गोवंश जनावराचा मालक यांचे हे े कृत्य कलम महाराष्ट प्राणी संरक्षण अधिनियम १९९५५(अ),(१),(२),९ प्राण्याचा छळप्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११(घ),(ड),(च) प्रमाने होत असल्याने सदर चा गुन्हा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन दाखल |
| ४ | पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४०/२०२३ कलम १२२ मपोका | बस स्थानक परीसर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.०९/०८/२३ चे २१.४५ वा दा.ता.वेळ १०/८/२३ चे ००.२६ वा | सर तर्फे सपोउपनि रंगराव जाधव ब नं ९२१ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | शेख येजाजउद्दीन उर्फ हनुमान शेख निजामउद्दीन वय ३५ वर्ष रा अलीमनगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की आज दि.९/८/२३ चे २१.०० वा ते १०/८/२३ चे ०९.०० वा पोवेतो आम्ही व सोबत नापोका १२,पोका ३२८,१५५२ असे आमची पो.स्टे हद्दीत स्वतःचे वाहनाची पेट्रोलींग डयुटी करीत असतांना २१.४५ वा चित्रा चौक येथे असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की ईतवारा बाजार परीसर अमरावती येथे एक ईसम अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याचे उद्देशाने उभा आहे वरुण दोन पंच व पोस्टॉफ असे ईतवाराबाजार परीसपात एक ईसम उभा दिसला आम्ही व पो.स्टॉफ ला पाहुन पळुन जाण्याचे बेतात असतांना पो.स्टफ्फि मदतीने जागीच पकडुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख येजाजउद्दीन उर्फ हनुमान शेख निजामउद्दीन वय ३५ वर्ष रा अलीमनगर अमरावती असे सांगीतले त्याला संशईतरित्या हालचाल करीत असतांना दिसुन आला त्यावरुण त्याला रात्रीचे अंधारात उभा राहण्याचे कारण विचारले असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर न देतो उडवाउडवीचे उत्तर दिले त्यावरुण आम्ही दोन पंचाना घटनास्थळी बोलावुन त्याचो समक्ष आम्ही त्यानंतर सदर ईसमाचे अंगझडती पंचनामा करण्यात आला सदर ईसम हा चोरी करण्याचे ईराद्याने किंवा दखलपात्र गुन्हा करण्याचे ईराद्याने दिसुन आला वरुण सदरचा े सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४१/२०२३ कलम १२२ मपोका | बस स्थानक परीसर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.०९/०८/२३ चे २३.३० वा दा.ता.वेळ १०/८/२३ चे ०२.२० वा | सर तर्फे सपोउपनि रंगराव जाधव ब नं ९२१ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | अर्जुन सायुब ह्युसुनकर, वय ३० वर्ष, रा, बेतुल मध्यप्रदेश | हकीकत अशाप्रकारे आहे की आज दि.९/८/२३ चे २१.०० वा ते १०/८/२३ चे ०९.०० वा पोवेतो आम्ही व सोबत नापोका १२,पोका ३२८,१५५२ असे आमची पो.स्टे हद्दीत स्वतःचे वाहनाची पेट्रोलींग डयुटी करीत असतांना २३.३० वा बस स्थानक , अम. येथे असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की टोपे नगर अमरावती येथे एक ईसम अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याचे उद्देशाने उभा आहे वरुण दोन पंच व पोस्टॉफ असे ईतवाराबाजार परीसपात एक ईसम उभा दिसला आम्ही व पो.स्टॉफ ला पाहुन पळुन जाण्याचे बेतात असतांना पो.स्टफ्फि मदतीने जागीच पकडुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अर्जुन सायुब ह्युसुनकर, वय ३० वर्ष, रा, बेतुल मध्यप्रदेश असे सांगीतले त्याला संशईतरित्या हालचाल करीत असतांना दिसुन आला त्यावरुण त्याला राञीचे अंधारात उभा राहण्याचे कारण विचारले असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर न देतो उडवाउडवीचे उत्तर दिले त्यावरुण आम्ही दोन पंचाना घटनास्थळी बोलावुन त्याचो समक्ष आम्ही त्यानंतर सदर ईसमाचे अंगझडती पंचनामा करण्यात आला सदर ईसम हा चोरी करण्याचे ईराद्याने किंवा दखलपात्र गुन्हा करण्याचे ईराद्याने दिसुन आला वरुण सदरचा ो सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो. स्टे. राजापेठ मर्ग क्र. ८३/२०२३ कलम १७४ जा.फौ. | झोम क्र. 02 | घटनास्थळ - रिम्स हॉस्पीटल अमरावती<br><br>घ.ता.वेळ - दि. 09/08/2023 चे 21-45 वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. 10/08/2023 चे 02-42 वा. | चेतन सुरेंद्र देशमुख वय २८ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती | सुरेंद्र गुणवंतराव देशमुख वय ५४ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती | रोड अपघात (RTA) डोक्याला मार लागल्याने उपचारादरम्यान मृत्यु | थोडक्यिांत हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी सुरेंद्र गुणवंतराव देशमुख वय ५४ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती यांनी पो.स्टे. ला रिपोर्ट दिला की, त्यांचा मोठा मुलगा चेतन व त्याचे सोबत त्याचे तार मित्र कंपनीच गाडीने कंपनीचे कामानिमित्य वर्धा येथे गेले होते. परत येत असतांना रेल्वे गेट जवळ बायपास पासिंग जवळ कोण्यातरी कारने अपघात केला त्यामुळे फिर्यादीचा मुलगा चेतन सुरेंद्र देशमुख वय २८ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती यांच्या डोक्याला मार लागला व त्याला रिम्स हॉस्पीटल अमरावती येथे भर्ती केल्याची फोनव्दारे माहिती मिळाली. हॉस्पीटल येथे जावुन पाहिले असता फिर्यादीचा मुलगा आयसीयु मध्ये भर्ती होता. उपचारा दरम्यान मरण पावला. असा मरणाचा मेमो व फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून मर्ग दाखल करून तपासात घेतला. | ASI रविंद्र केने ब.नं. ७६६ पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर |

## दिनांक १६/०४/२०२३ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो ठाणे बडनेरा | अप क्र ५८०/२०२३ कलम १२ अ मजुका | चावडी चौक जुनी वस्ती बडनेरा | दि १०/०८/२०२३ चे १३/०० | दि १०/०८/२०२३ चे १५.३० | नापोका प्रविद्र राठोड ब.न १४५२ पोस्टे बडनेरा | सुमित बंडुराव महल्ले वय-२९ वर्ष रा.चावडी चौक जु.व.बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १) नगदी ११४५/- रू., २) ०१ ते १० आकडयाच्या वरली मटकाच्या चिठ्या ३) एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण ११५०/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |

**दिनांक १६/०४/२०२३रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो.स्टे नागपुरीगेट | अप क्र ३८५/२३ कलम ८५(१),(२) मदाका | सिद्धीकी अकबर मस्जीद जवळ जाकीर कॉलणी अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे २२/४५ वा | दि. १०/०८/२०२३ चे ०१/२५ वा | ग्रेड पोउपनि गजानन विधाते पो.स्टे नागपुरीगेट | शेख तौफीक शेख रफीक वय २२ रा कमेला ग्राउंड अमरावती | हकीकत अशा प्रकारे ` आहे ` की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी दारुच्या नशेत जोर जोराने ओरडुन अस्भभतेचे गैरवर्तन करतांना मिळुन आला नमुद आरोपी चे वैद्यकीय तपासणी केली असता नमुद आरोपी हा दारु च्या नशेत आहे. असा लेखी अभिप्राय एम ओ. सा यांनी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |